
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# 'पाणी बाणी' काव्यसंग्रहात मांडलेले पाणी प्रश्न आणि चिंतन




**डॉ. संभाजी मलघे**
**इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे,पुणे.**

## सारांश–

संपादित पुस्तके विशिष्ट हेतूने निर्माण केलेली असतात. एखादी कल्पना, एखादी विचारसरणी, एख़ाद्या प्रश्नाचा सखोल शोध वेध घेण्यासाठी संपादन केले जाते. संपादनासाठी जो विषय निवडला जातो, त्या विषयाचे सखोल ज्ञान संपादकाकडे असणे ही पूर्वअट असते. त्या विषयासंबंधीचे पूर्वसूरींचे मत, मांडणी यांचाही विचार करावा लागतो.

## प्रस्तावना–

'पाणीबाणी' या काव्यसंग्रहाचे संपादन प्रभाकर साळेगावकर यांनी केले आहे. 'पाणी' हा विषय मध्यवर्ती ठेवला आहे. या अनुषंगाने त्यांनी कवितांची निवड केली आहे. मानवलोक–अंबाजोगाई येथे दत्ताबाळसराफ. अनिकेत लोहिया, अतुल कुलकर्णी, प्रदीप पुरंदरे यांच्याबरोबर या संग्रहाच्या संपादकांची अनौपचारिक चर्चा झाली. या विषयावरच्या कवितांचं संपादन करण्याबाबतची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. त्याची फलश्रुती म्हणजे 'पाणी बाणी' हा संग्रह.

'पाणी बाणी' मधील ही चर्चा 'दुष्काळ अभिसरण शिबीरात घडून आली होती. या संग्रहातील कवितांबाबत दत्ता बाळसराफ यांनी आपले मत असे मांडले आहे. ''या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने माझ्या मनात नेहमीच डोकावणारा विचार व्यक्त करण्याची संधी घेतो. मला सतत जाणवत राहते की माणसांच्या एकूणच जीवन व्यवहारांवर त्याच्या पर्यावरणीय परिसराचा सखोल ठसा उमटलेला असतो. माणसांची शारिरीक ठेवण, खाद्य पदार्थ, पेहराव, उद्योग, व्यापार, अशा भौतिक गोष्टींसोबतच रीतीरिवाज, सण, उत्सव, भाषा साहित्य, विचार प्रक्रिया यासारख्या सांस्कृतिक वैचारिक बाबतीतही तो जाणवतो. म्हणून साहित्याची पर्यावरणीय समीक्षासुद्धा होणे गरजेचे आहे, जी साहित्याकडे पाहण्याची नवी दृष्टी देईल.''[1] या दृष्टीने या संग्रहाचे वेगळे मोल आहे, हे या भूमिकेतून व्यक्त केले आहे.

या शोधनिबंधात या काव्यसंग्रहातील कवितांचा साहित्य समीक्षेच्या अंगाने, आस्वादक समीक्षेच्या अंगाने विचार केला आहे. या कविता संग्रहातील कविता कोणती अनभूती देतात? कोणते नवे चिंतन करावयास भाग पाडतात, आणि या कवितेतील वाङ्मयीन सौंदर्यस्थळे शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

या संग्रहात जवळपास 50 कवींच्या कवितांचा समावेश आहे. या कवींमध्ये 10 कवी प्रथित यश आहेत. ते या महाराष्ट्राला परिचित आहेत. या 10 कवींमध्ये नारायण सुमंत, इंद्रजीत भालेराव, रेणू पाचपोर, देवीदास फुलारी, प्रकाश होळकर, संजय बोरूडे, प्रा. प्रशांत मोरे, तुकाराम धांडे, किशोर पाठक, जयराम खेडेकर याचा समावेश आहे.

नारायण सुमंत यांनी शासकीय योजनांची खिल्ली उडविली आहे ती अशी–
''पाणी अडवा पाणी जिरवा योजनाची खाज रे
थेंब ना कोठे म्हणे अन् बांध घाला वाकडा।।
त्यामुळे शासनाने शेतीमधील क्रांतीचा कितीही टांगोरा पिटला तरी तो खोटा ठरतो.

धरण झाले बांधुनी अन् पावसाला कोरडा
हरितक्रांती धवलक्रांती गलबला खोटारडा

शेकडो धरणं बांधली गेली, मात्र त्यात पाणी नाही. शेतकऱ्याची शेती आणि डोळे कोरडेच राहिलेले दिसतात. त्यामुळे आपल्या बापाची, शेताची अवस्था कशी झाली आहे हे कवीने मांडले आहे.

ओसझाल्या कुपनलिका ठिबक सिंचन बंद रे
आसवांनी शिंपितो मी रान माझे बापुडे''[2]
हे जमिनीचे वास्तव आहे, ही रानाची अवस्था आहे ती या कवितेत मांडली आहे.
इंद्राजित भालेराव यांनी पावसाच्या वागण्यालाच बोल लावला आहे.
''गेली गांजून धरणी
पावसाच्या वागण्याला
घरी न येणाऱ्यासाठी
कार्य अर्थ जागण्याला
पावसाने छळण्याचा
केला जाणून कहर
धरणीने जीव द्याया
कुठे शोधावी विहीर''[3]

पावसाची वाट पाहण्यात अर्थ नाही, कारण दुष्काळ पडलेला आहे. पावसाने शेतकऱ्यांना छळण्याचा कहर केला आहे. आता एकटया शेतकऱ्याला जीव देवून भागणार नाही, तर साऱ्या पृथ्वीलाच जीव देण्याची वेळ आली आहे. मात्र जीव देण्यासाठी विहीर कुठे शोधायची? असा प्रश्न कवीने उपस्थित केला आहे. कवी या काळातले प्रश्न मांडत आहे. असे प्रश्न उपस्थित करणे ही त्याच्या जिवंतपणाची खूण आहे. तो सामाजिक प्रश्नांबाबत समाजाशी संवाद करीत आहे कविता आणि कवी यांच्यामधील या निर्मिती प्रक्रियेबाबत डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात– ''कवी हा स्वतःशी किंवा स्वतःविषयी बोलून थांबत नाही. त्याचा संवाद इतरांशीही चाललेला असतो. स्वतःच्या काळाशी आणि समकालीनांशी त्याला नाते जोडायचे असते. वादही घालावा लागतो.''[4] कवीने वाद घातलाय तो इथल्या शासनव्यवस्थेशी, निसर्गाची अपरिमित हानी केल्यामुळे पाऊस रुसला आहे. साऱ्या पृथ्वीलाच आता जीव देण्याची वेळ आली आहे, असे चिंतन कवीने मांडले आहे.

प्रकाश होळकर यांनी पाऊस न पडल्यामुळे निर्माण झालेली विदारक स्थिती मांडली आहे. 'कोरडे नक्षत्र' कवितेत कवी म्हणतात–

''पाणी मागावे नभाला
नभ कोरडे कोरडे
डोई पोटावर भार
आणि घागरीला तडे
पाणी शोधता शोधता
जीव घाबरा होताना
गाईगुरांचा हंबर
सांज भरुन येताना''[5]

माणसांची, स्त्रियांची, गुरावासरांची ही स्थिती या कवितेत कवीने मांडली आहे. हेच जीवन दुष्काळात शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले दिसते.

कवी प्रा. प्रशांत मोरे यांनी पावसाभोवतीचे पाण्याभोवतीचे जुने ऐतिहासिक संदर्भ नोंदविले आहेत. तो पाण्याचा इतिहास आहे. 'दे रे आभाळा दे पाणी' कवितेत ते म्हणतात–

''कोरड्या हौदापाशी माझा जोतिबा ग उभा
त्याच्या डोळ्यात जमली खऱ्या आसवांची सभा
ओझं रिकाम्या हंड्याचं बाई उचलावं कुणी
देरे आभाळा दे पाणी...
रोहिणी नदीचा ग बाई मिटलाया वाद
राजा सिद्धार्थाचा चाले आता पाण्यासाठी शोध
महाडच्या तळयाकाठी आता नवी न कहाणी
देरे आभाळा दे पाणी।''[6]

पाण्याभोवतीचे हे सामाजिक, सांस्कृतिक प्रश्न आहेत. पाणी हा माणसांचा हक्क तो नाकारला गेला होता. जर यावरून रणकंदन माजलेले दिसते. तसेच रणकंदन आजही होताना दिसते. उदा. कावेरी पाणी प्रश्न असे प्रश्न सोडावेताना कवी, कलावंत यांचे विचार आणि त्यांचे साहित्यच कामी येत असते. ''या संहारक अण्वस्त्रांच्या युगावत कवितेची मातीची पणती आपल्या कामी येईल काय? तर होय, कारण त्याच्या हीच मातीची पणती माणसाला त्याच्याही मृण्मयतेची जाणीव देत राहील. म्हणूनच आपल्या युगाचे अपराधी मन जपणे हेच कवीचे काम आहे.''[7] सेंट जॉन पर्स या नोबेल पुरस्कार विजेत्या फ्रेंच कवीचे उद्गार कवितेच्या महान कार्याची जाणीव करून देतात. कविता किती गहन प्रश्न सोडवू शकते ही जाणीव या महाकवीने करून दिली आहे. कवी प्रशांत मोरे यांनी याच वाटेवरून 'पाणी' प्रश्न मांडला आहे. पाण्याभोवती फिरणारे समाजमन, सामाजिक प्रश्न मांडले आहेत.

'साहेब' या कवितेत तुकाराम धांडे यांनी 'कलियुगातील रामाला' पाण्यासाठी साद घातली आहे. पुराणात रामाने पाण्यासाठी तडफडणाऱ्या जटायूसाठी जमिनीत बाण मारून पाण्याची धार बाहेर काढली होती, आणि पाणी निर्माण केले होते. आमच्या 'पुढारी साहेबाने' असाच चमत्कार करावा अशी लोकांनी व्यक्त केलेली अपेक्षा कवीने मांडली आहे ती अशी–

''जाऊद्या साहेब ती जुनी गोष्ट झाली
पण आता... या कलियुगामंदी...तुम्ही
त्या तिकडच्या धरणातून
चिफरानी पाणी उचलून
पाईपातून तळातून कहयानच का व्हईना
या डोंगराच्या मध्यापर्यंत आणून सोडलं
अन् एखाद्या कपारीतून भका भका बाहेर सोडलं
न तुम्ही रामापेक्षाय मोठं व्हऊन जाल
राहता रहीली मनांची बात
त हा लक्ष्मीचा चारा हातात
घेऊन सांगतो साहेब
असं जर झालं ना।
ही इथली उघडी नागडी पोरं सोरं
यड्या धड्या बाया बापड्या
डोईवर हात ठिऊन आभाळ न्याहाळणारी
म्हतारी कोतारी माणसं
इतकंच नहीं तर डोंग्याच्या
अंगाखाद्यांवर खेळणारी मुकी जनावरं
आणि रानपाखरं
या सगळेंची लाख लाख मन
तुम्हालाच मिळतील साहेब
तुम्हालाच मिळतील...''[8]

लोकशाहीने अद्यापपर्यंत अन्न, वस्त्र, निवारा हे मूलभूत प्रश्नही सोडवलेले नाहीत. पाणी जीवनावश्यक गोष्ट, मात्र स्वातंत्र्याला 70 वर्षे होत आली तरी सामान्य माणसाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न राज्यकर्त्यांना सोडविता आला नाही, हे इथल्या राज्यव्यवस्थेचे मोठे अपयश आहे. कित्येक वर्षांपासून हे सर्व प्रश्न सुटलेले नाहीत, या प्रश्नांचे भांडवल करत, प्रश्न धगधगते ठेऊन राज्यकर्ते मतांचे, सत्तेचे राजकारण करीत असतात. आणि हतबल जनता 'पाणी–पाणी' करत असते. माणसं, निसर्गातील झाडे–झुडपे, मुकी जनावरं पाण्याची वाट पहात आहेत. हे विदारक वास्तव या कवितेतून कवीने व्यक्त केले आहे. त्याचबरोबर 'लोकप्रतिनिधी' म्हणवून घेणाऱ्या पुढाऱ्याचे निर्ढावलेपण स्पष्ट केले आहे.

कवी किशोर पाठक यांनी 'पाणी पाणी पाणी' या कवितेतून दुष्काळचा शेतकऱ्यावर होणारा शेवटचा आघात वर्णन करून सांगितला आहे. पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेत आणि शेतकऱ्यांची होणारी उलघाल त्यांनी सांगितली आहे.

''पाणी गेले कुठे
झाले डोळे ओले
संताप भूईचा
चटके चावले
पाणी पाणी पाणी
काहिली त अर
भुईत रोवला
काळजाचा पूर
गळाठली पोर
गळयातला दोर
ओढतंय कुणी''[9]

अशी शेतकऱ्याची गत पाणी कुठे गेले? हा प्रश्न असा शेतकऱ्यांना पडला आहे, तसाच प्रश्न सरकारला पडला आहे. आणि तसाच प्रश्न पर्यावरणप्रेमी माणसांना पडला आहे. निसर्गाचे चक्र बिघडले अशी हाकाटी पिटली जाते, ती रास्त आहे. मात्र या समस्यानिर्मिती मागील कारणांचा शोध कुणी घेतला आहे का? हा खरा प्रश्न आहे. या समस्येची जबाबदारी नेमकी कुणावर हा प्रश्न तर कायम अनुत्तरीत राहिला आहे. शेतकऱ्यांच्या या प्रश्नाचे उत्तर कुणाकडेही नाही ''आजही ग्रामीण भागातील मूळ प्रश्न कायम आहेत. नवे प्रश्न निर्माण झाले आहेत आणि त्यात पुन्हा भर टाकण्याचे काम नवी यंत्रणा, नवी व्यवस्था करते आहे. शेती आणि शेतकरी यांच्यात येणारे परिवर्तन केवळ प्रश्नांचेच आहे. बाकी शेती, शेती क्षेत्राशी संबंधित लोक आणि शेतकरी आहेत तसेच आहेत.''[10] म्हणूनच शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येते हेच अंतीम कटू सत्य समोर येते. वृक्ष लागवड, जलसंधारणाची सुयोग्य कामे, पाणी अडवा, पाणी जिरवा अश प्रकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, दुष्काळात दुष्काळी कामाचे नियोजन करणारी प्रभावी प्रशासकीय यंत्रणा यांचा आधार शेतकऱ्यांना मिळाला असता, तर शेतकऱ्यांना अशा आत्महत्या करण्याची वेळ आली नसती हा आशय ही कविता व्यक्त करते. अल्पाक्षरांमधून व्यापक आशय व्यक्त करणारी ही कविता आहे.

प्रशांत असनारे या कवीची अत्यंत प्रभावी, चिंतनशील कविता या संग्रहात आहे. अत्यंत उंचीची ही कविता अनेक प्रश्न उभे करते, कितीतरी अंगानी चिंतन करायला भाग पाडते. ही कविता म्हणजे 'पूर्वी' या शीर्षकाची ही कविता–

''पूर्वी
ढगांना नुसता हात लावला
की मुसळधार पाऊस पडायचा,
आताढगांना हातात घेऊन गदगदा हालवलं
तरी थेंब निथळत नाही.

पूर्वी
विहिरीत नुसता हात टाकला
का हाताला पाणी लागायचं
आता बुडाशी जाऊन बसलं
तरी ओंजळ भरत नाही
पूर्वी
माणसांच्या खांद्यांवर नुसता हात ठेवला
की हात चिंब भिजायचा
आता ह्रदयात हात घातला तरी
ओल लागत नाही
थोडक्यात
हेढग काय,
ही विहिर काय,
हा माणूस काय
चराचरातून पाणी आटत चाललंय
हेच खरं।''[11]

या कवितेतून जुना—नवा काळ संपूर्ण बदलांसह टिपला आहे. पूर्वीचा निसर्ग आजचा निसर्ग, पूर्वीची माणसे, आजची माणसे यामधले ठळक बदल कवीने फार मार्मिकपणे टिपले आहेत. माणसं पूर्वी हळवी होती, एकमेकांना समजून घेणारी होती. काळजाचे गाऱ्हाणे ऐकणारी होती. त्यांच्या मनात, ह्रदयात माणुसकी ओतप्रोत भरलेली होती. आता माणसांच्या काळजातच ओलावा नाही. माणुसकीचा पाझर नाही, तर माणसांकडून कोणत्या ओलाव्याची, भावनांची, समजुतीची अपेक्षा करायची? हा या कविचा रोकडा सवाल आहे. हा सवाल निसर्गाला आहे. इथल्या प्रत्येक बदललेल्या गोष्टीला त्यांनी सवाल केला आहे. विहिरीचं पाणी जाणं ही वरवर सोपी घटना वाटते, मात्र ते पाणी जाण्यापाठीमागे अनेक गोष्टी आहेत. प्रचंड केला जाणारा पाण्याचा उपसा, जमिनीतलं सपणारं पाणी, कमी होणारा पाऊस, कुपनलिकांनी उपसलेलं पाणी, माणसाची प्रचंड तृष्णा या मागे दडलेल्या आहेत. शेवटी कवीने मांडलेले चिंतन तर गंभीर विचार करायला भाग पाडते. चराचरातून सारं पाणी आटत चाललंय हेच खरं सत्य आहे. पिण्याचा कमी—कमी होत जाणारा साठा, शेतीचे कमी—कमी होत जाणारे पाणी, पावसाचे कमी होत जाणारे पाणी हा 'पाणीप्रश्न' वैश्विक प्रश्न आहे हे सिद्ध होते. कविने या प्रश्नाचे व्यापकपण नेमक्या शब्दात मांडले आहे.

बालाजी मदन इंगळे यांची 'पाणीच शहाणं करतं मुलींना' ही एक विलक्षण वेगळया मांडणीची, वेगळ्या आशयाची कविता आहे. दुःखातून जीवन जगण्याचा पाठ पाणी कसे शिकवतो? याचा उलगडा या कवितेत कवीने केला आहे.

''भर उन्हात
लाईनीतल्या घागरी
सरकाव्या लागतात पुढे पुढे
किंवा धावून
लांब शिवारातून घरापर्यंत
डोक्यावर भरलेली घागर घेऊन
चालावं लागत भरभर
किंवा
टँकर आला की
त्याच्यावर तुटून पडावं लागतं
जीवाच्या आकांतानं

मग
इतक्या कष्टातून मिळवलेलं पाणी
कसं वापरावं
हे शिकवावं लागत नाही मुलींना
कारण
पाणीच शहाणं करीत असतं मुलींना।''[12]

खेडयातील मुलींच्या वाटयाला हे असं जीवघेणं शिकणं लिहिलेल असतं. पाणी म्हणजे जीवन. पाणी जीवन जगवण्याचं शिकवतं हा कवीतेला मुख्य आशय आहे.

या काव्यसंग्रहात पाणी बचत, पाणी बचतीचे विविध उपाय, कृत्रिम पाऊस, त्याचे परिणाम, वृक्षलागवडीची गरज पाणी आणि जमिनीचे नाते, नापिक जमीनींचा प्रश्न, नदीतील प्रदुषण, नदीचे बदलते स्वरूप, आटलेल्या नदयांचे विद्रुपरूप, नासलेले, दुषित झालेले पाणी, पाणी तहान भागवणारे, चिमणी कावळयांसाठीही पाणी लागते याची जाणीव, नभाले गाऱ्हाणे ऋतूबदल, त्याचे गंभीर परिणाम, दगा देणारी पावसाची नक्षत्रे, पावसासाठी केलेले नवस सायास, देवदेवतांच्या पूजा पावसाअभावी होडया सोडता न आल्याने दुःखी झालेली मुलं श्रावण नाही, हिरवळ नाही अशी बोडकी कविता लिहिण्याचं दुःख, या कवितांमधून व्यक्त झाले आहे. शामसुंदर झोन्नर सारख्या कविला प्रश्न पडतो.

''वर्षा ऋतू सरत आला
वर्षावाचून सुकली शेते
वर्षामध्ये मुख्यमंत्र्यांना
झोप तरी हो कशी येते?''[13]

शेतकऱ्यांचे सारे प्रश्न राजकारणाऱ्या, सत्ताधाऱ्यांशी येऊन थांबतात

या काव्यसंग्रहातील कवितांमधून या सजग कविंनी 'पाणी' प्रश्नाची विविध रूपे मांडली आहेत. शेत, शेतकरी आणि पाणी या भोवतीचे भावजीवन मांडले आहे. न सुटणाऱ्या प्रश्नांचे जग चिंतन मांडले आहे. कधी पोटतिडकीने उपाय सुचविले आहेत. तर कधी चीड उद्विग्नता व्यक्त केली आहे.

मात्र हे सारे कवी उद्याच्या हिरव्या पाणीदार जगाचे स्वप्न डोळयात घेऊन जगत आहेत, इतरांना जगविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या चिंतनाचे हे सकारात्मक सुंदर फलीत आहे.

## संदर्भ

1. साळेगावकर प्रभाकर (संपा.), पाणीबाणी (काव्यसंग्रह), ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती 2016 पृ.13
2. उपरोक्त, पृ.02
3. उपरोक्त, पृ.
4. डॉ. वाघमारे जनार्दन, साहित्यचिंतन, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1992, पृ.142
5. साळेगावकर प्रभाकर, उपरोक्त, पृ.31
6. साळेगावकर प्रभाकर, उपरोक्त, पृ. 94 व 95
7. जाधव रा. ग., मराठी वाङ्मय स्वातंत्र्योत्तर संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1998, पृ.148
8. साळेगावकर प्रभाकर, उपरोक्त, पृ. 128
9. साळेगावकर प्रभाकर, उपरोक्त, पृ. 133
10. काळे रावसाहेब, काकडे श्रीकृष्ण, समकालीन ग्रामीण साहित्य, डॉ. विठ्ठल वाघ गौरव ग्रंथ, पृ.72
11. साळेगावकर प्रभाकर, उपरोक्त, पृ. 10 व 11
12. साळेगावकर प्रभाकर, उपरोक्त, पृ. 39
13. साळेगावकर प्रभाकर, उपरोक्त, पृ. 39